# कोंबड्यामधील 'बर्ड फ्लू' या विषाणूजन्य रोगाविषयी संभ्रम, काळजी आणि उपाययोजना

**डॉ. धनंजय सातपुते**
सहाय्यक प्राध्यापक
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
आदित्य कृषी महाविद्यालय, बीड

**प्रा. चादर यू. ए.**
सहाय्यक प्राध्यापक
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
आदित्य कृषी महाविद्यालय, बीड

## बर्ड फ्लू काय आहे?

'बर्ड फ्लू' हा आजार एच ५ एन १ या व्हायरसमुळे होतो. याला एव्हियन इनफ्लूएन्झा म्हणतात. मुख्यतः हा विषाणू बदक, कोंबड्या आणि स्थलांतरित पक्ष्यांमध्ये आढळतो आणि तो संसर्गजन्य आहे. अनेकदा स्थलांतरित पक्ष्यांमुळे संसर्ग पसरण्याच क्षेत्र वाढत तो माणसांमध्येही पसरू शकतो.





१९९७ मध्ये बर्ड फ्लूच माणसांतल्या संसर्गाच पहिल प्रकरण आढळल होत. हाँगकाँगमधल्या पक्षी बाजारापासून याची सुरुवात झाली होती आणि या विषाणूचा संसर्ग झालेल्या ६० टक्के लोकांचा तेव्हा मृत्यू झाला होता. पण हा बर्ड फ्लू माणसांमध्ये एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे सहजासहजी पसरू शकत नाही. जी लोक एकमेकांच्या अगदी जवळच्या संपर्कात असतात, त्यांच्यातच याचा संसर्ग पसरल्याच आढळून आलय.

## चिकन आणि अंडी खाणं बंद करायचं का?

नाही. तस करायची गरज नाही. चिकन म्हणजे मांस आणि अंडी पूर्णपणे शिजवलेली असतील तर ते खायला सुरक्षित असल्याच WHO ने एका पत्रकाद्वारे यापूर्वीच सांगितलेल आहे. ज्या भागांमध्ये बर्ड फ्लूचा आऊटब्रेक नाही, तिथली पोल्ट्री प्रॉडक्ट्स हाताळल्याने वा खाल्ल्याने बर्ड फ्लूचा धोका उद्भवत नाही अस WHO ने म्हटलय.

मांस शिजवताना ते उकळून शिजवाव, कच्च वा आतून लाल राहू नयेत, अंडी पूर्णपणे उकडावीत अस WHO ने म्हटलय.

## बर्ड फ्लूची माणसांतली लक्षण काय?

भारतामध्ये अद्याप माणसांमध्ये बर्ड फ्लू झाल्याच प्रकरण आढळलेल नाही. पण हा विषाणूही मानवी शरीराच्या श्वसन यंत्रणेवर हल्ला करतो आणि यामुळे न्युमोनिया किंवा अक्युट रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम होण्याची शक्यता असते. ताप - सर्दी, घसा खवखवण, पोटात दुखण, डायरिया ही याची लक्षण असू शकतात.

## बर्ड फ्लू होण्याचा धोका कोणाला आहे?

तुम्ही कोंबड्या - बदक पाळली असतील, त्यांना हाताळत असाल किंवा तुमच पोल्ट्री फार्म आहे जिथे भरपूर कोंबड्या आहेत किंवा मग कोंबड्यांच्या मांस विक्रीशी तुमचा जवळचा संबंध असेल तर तुम्हाला या संसर्गाची शक्यता आहे. म्हणूनच पक्षी हाताळताना रबर ग्लोव्हज आणि मास्क, फेस शील्ड किंवा पी.पी.इ. चा वापर करावा.

## काय खबरदारी घ्याल?

- पक्ष्यांच्या स्त्रावासोबत तसंच विष्ठेसोबत संपर्क टाळा.
- पक्षी, कोंबड्या यांचे पिंजरे आणि ज्या भांड्यात त्यांना रोज खाणे दिले जाते अशी भांडी रोज डिटर्जंट पावडरने स्वच्छ धुवा.
- शिल्लक राहिलेल्या मांसाची योग्य विल्हेवाट लावा.
- एखादा पक्षी मरण पावला तर अशा पक्षाला उघड्या हाताने स्पर्श करू नका. जिल्हा तसच विभागीय नियंत्रण कक्षाला ताबडतोब कळवा.
- कच्च्या पोल्ट्री उत्पादनांसोबत काम करताना पाणी आणि साबणाने आपले हात वारंवार धुवा. व्यक्तिगत स्वच्छता राखा. परिसर स्वच्छ ठेवा.
- कच्चे चिकन किंवा चिकन उत्पादनासोबत काम करताना मास्क आणि ग्लोजचा वापर करा.
- पूर्ण शिजवलेले मासच खा.
- आपल्या परिसरात जलाशय किंवा तलाव असतील आणि या तलावात पक्षी येत असतील तर अशी ठिकाण वनविभाग अथवा पशुसंवर्धन विभागात कळविण आवश्यक आहे.

## हे अजिबात करू नका:

- कच्च चिकन किंवा कच्ची अंडी खाऊ नका.
- अर्धवट शिजलेले मांस/चिकन किंवा अर्धवट उकडलेली अंडी खाऊ नका.
- आजारी दिसणाऱ्या, सुस्त पडलेल्या पक्षाच्या संपर्कात येऊ नका.
- पूर्णपणे शिजलेल मांस आणि कच्च मांस एकत्र ठेवू नका.

(संपर्क: +९१ ९७६३९९६६७७)

★ ★ ★